MHLA050006602018

विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०१८
विजया वि. भागवत

## नि.क्र. ९० खालील आदेश

**०१.** प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्ज देवून नमूद केले की, त्यांच्या भावाची ऱ्हदय शस्त्रक्रिया पुणे येथे झाली असून त्यांच्या सेवासुश्रूषेसाठी ते पुण्याला असताना त्यांनी पुरावा दिला नाही म्हणून दि.०९/०४/२०२५ रोजी त्यांचा पुरावा बंद केला आहे. जाणीवपुर्वक त्यांनी पुरावा दिला नाही असे घडले नाही. त्यामुळे, तो आदेश रद्द व्हावा व त्यांचे शपथपत्र पटलावर घ्यावे अशी विनंती करण्यात आली.

**०२.** वादी यांनी दिलेल्या म्हणण्यानूसार प्रकरण विनाकारण प्रलंबित ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. अर्जात नमूद कारण खोटे असून त्यामुळे, वादीस आर्थीक व मानसिक त्रास झाला आहे. म्हणून, अर्ज खर्चासह नामंजूर व्हावा.

**०३.** वादीने दि.१६/०१/२०२५ रोजी नि.क्र.८६ अन्वये आपला पुरावा बंद केला. त्यापुढे दि.१०/०२/२०२५ रोजी प्रतिवादीततर्फे तोंडी विनंती केल्याप्रमाणे प्रकरण पुढे ठेवण्यात आले. दि.०५/०३/२०२५ रोजीचा प्रतिवादी क्र.८३ प्रमाणेचा अर्ज अखेरची संधी म्हणून मंजूर झाला. त्यानंतही नि.क्र.८८ चा अर्ज मंजूर झाला. अशाच प्रकारचा मजकुराचा नि.क्र.८९ चा अर्ज नामंजूर झाला व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा पुरावा बंद झाला. त्यानंतर प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या पुराव्यावर प्रकरण ठेवून दि.११/०६/२०२५ रोजी त्यांचा पुरावा देण्यास संधी देण्यात आली. दि.२७/०६/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचा पुरावा बंद झाला.

**०४.** प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दि.१०/०२/२०२५ ते २७/०६/०२५ या काळात नेमके कधी रुग्णालयामध्ये ते गेले होते, शस्त्रक्रिया कधी झाली, किंवा ती

झाली का याबद्दल पुरावा दिला नाही. या अर्जासोबत शपथपत्र नि.क्र.९१ दाखल केले. त्यावर विसबून सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो. अर्ज नामंजूर झाल्यास पुन्हा वरिष्ठ न्यायालयापुढे त्याविरुध्द दाद मागण्याचा त्यांचा अधिकार आहे. मात्र, त्यात कालअपव्यय होण्यापेक्षा प्रतिवादीस संपरीक्षा न्यायालयाने पुर्ण संधी देणे आवश्यक असल्याने त्याच्याविरुध्द झालेला पुरावा नाही हा आदेश बाजूस सारण्यात येतो. प्रतिवादीने आजरोजी पुराव्याच्या शपथपत्रासह साक्षी यादी द्यावी आणि वादी यांना रुपये १,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी.

स्वाक्षरीत/-

**दिनांक ०५/०७/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**